स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade
STUDENT WELFARE DEPARTMENT
Phone: (02462) 229525
Fax : (02462) 229572
Website: www.srtmun.ac.in
E-mail: dswsrtmunm@gmail.com

जा.क्र.वि.क/बहि/परीपत्रक/२०१५–१६/११७२८ दि.२९/१२/२०१५

प्रति,
प्राचार्य,
सर्व सलग्नित महाविद्यालये,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,
नांदेड.

विषय : बहि:शाल शिक्षण केंद्र योजनेच्या कार्यात वक्ता म्हणून भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने सादर करावयाचा अर्ज

महोदय,

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये आपणास मा.कुलगुरुच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड, विद्यार्थी कल्याण विभागातंर्गत चालणाऱ्या बहि:शाल शिक्षण केंद्र योजनेच्या कार्यात वक्ता म्हणून भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये संपूर्ण माहिती भरुन विद्यार्थी कल्याण विभागाकडे दि.३१ जानेवारी २०१६ पर्यंत पाठवावी.
प्रपत्र अ) वक्ता निवड प्रक्रियेची माहिती व निकष.
ब) वक्ता निवड प्रक्रियेसाठी करावयाचा अर्ज.

स्वाक्षरीत/–
डॉ. राजेश्वर दुडूकनाळे
संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग.

प्रत माहितीस्तव :
श्री.अजय दर्शनकार, सीस्टीम एक्सपर्ट, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circular Regarding Orator of Bahishal Shikshan Kendra या शिर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home Page मधील New/Circular-School, Administration सदरातंर्गत प्रसिध्द्सि देण्यात यावे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade




**STUDENT WELFARE DEPARTMENT**

Phone: (02462) 229525
Fax : (02462) 229572
Website: www.srtmun.ac.in
E-mail: dswsrtmunm@gmail.com

## बहि:शाल शिक्षण केंद्र योजना

बहि:शाल शिक्षण केंद्र योजनेच्या कार्यात वक्ता म्हणून भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने सादर करावयाचा अर्ज

प्रति, दिनांक:
संचालक,
बहि:शाल शिक्षण केंद्र योजना,
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

महोदय,

स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, विद्यार्थी कल्याण विभागांतर्गत चालणाऱ्या बहि:शाल शिक्षण केंद्र योजनेच्या कार्यात वक्ता म्हणून मी भाग घेऊ इच्छितो. बहि:शाल शिक्षण केंद्र योजनेच्या प्रचलित सर्व नियमांची मी माहिती करून घेतलेली असून ते नियम मला मान्य आहेत. तरी वक्ता होण्याच्या प्रक्रियेस मला निमंत्रित करावे, ही विनंती.

मी सुचविलेल्या व्याख्यान विषयाचा थोडक्यात व्याख्यान सारांश या विनंती पत्रासोबत जोडून पाठवित आहे.

आपला

दिनांक: (स्वाक्षरी)..........................................

(विनंती पत्र पाठविणाऱ्या इच्छुकाने स्वत:च्या हस्ताक्षरात खालील माहिती पूर्णपणे लिहावी. अपूर्ण माहितीचा स्वीकार केला जाणार नाही.)

१. वक्त्याचे संपूर्ण नाव : ..............................................................

२. शैक्षणिक पात्रता : ..............................................................

३. नोकरी/व्यवसाय : ..............................................................

४. जन्म दिनांक : ...............................वय वर्ष पूर्ण .................

५. घरचा पूर्ण पत्ता : ..............................................................
..............................................................

..............................................................................

६. व्यवसायाचा पूर्ण पत्ता : ..............................................................

..............................................................................

७. अ) दूरध्वनी क्रमांक : ..............................................................................

ब) भ्रमणध्वनी : ..............................................................................

क) ईमेल : ..............................................................................

८. व्याख्यान देण्याचा अनुभव
कोठे व किती वर्षाचा? : ..............................................................................
(सोबत यादी जोडावी) ..............................................................................

९. प्रकाशित लेख/पुस्तके इ. : ..............................................................................
(सोबत यादी जोडावी.) : ..............................................................................

१०. निवडलेल्या व्याख्यान विषयाचे नाव
१)..............................................................................
२)..............................................................................
३)..............................................................................
..............................................................................

इच्छुक वक्त्याची स्वाक्षरी

व नाव ..............................................................................

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



**STUDENT WELFARE DEPARTMENT**

**Phone: (02462) 229525**
**Fax : (02462) 229572**
**Website: www.srtmun.ac.in**
**E-mail: dswsrtmunm@gmail.com**

# बहि:शाल शिक्षण केंद्र योजना

औपचारिक शिक्षणाच्या चौकटी बाहेर ज्ञानविस्तार व शाश्वत विकासाधिष्ठित समाजप्रबोधन व समाजपरिवर्तन करण्याच्या हेतूने बहि:शाल शिक्षण केंद्र स्वा.रा.ती.म. विद्यापीठात कार्यरत आहे.

बहि:शाल शिक्षण केंद्र योजनेच्या कार्यात वक्ता म्हणून भाग घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी माहिती व वक्ता निवडीचे निकष.

१. बहि:शाल शिक्षण केंद्राची स्थापना स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड,कार्यक्षेत्रात (नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली जिल्हा) केली जाते.
२. बहि:शाल शिक्षण केंद्रे महाविद्यालये, विद्यालये, सा. वाचनालय व सेवाभावी संस्था यांच्यामार्फत चालविली जातात.
३. बहि:शाल शिक्षण केंद्राची व्याख्याने ही सर्वांसाठी खुली असतात.
४. व्याख्यानाची तारीख व महिना वक्त्याने स्वत:ची व संबंधित केंद्राची सोय पाहून बहि:शाल शिक्षण केंद्राच्या नियमांना बाधा न येईल अशा रीतीने पूर्वपरवानगीने ठरवावयाची असतात.
५. वक्त्यास व्याख्यानानिमित्त मानधन, प्रवास खर्च व निवास भत्ता हे बहि:शाल शिक्षण केंद्राच्या प्रचलित नियमानुसार दिले जातात.
६. वक्त्यांनी वक्ता होण्याचा विनंती अर्ज भरून पाठविताना जे विषय व्याख्यानासाठी निवडलेले आहेत त्यापैकी एका विषयाचा व्याख्यान सारांश (कमीत कमी २००० शब्द) सोबत पाठविणे आवश्यक आहे.
७. वक्त्याने निवडलेल्या व्याख्यान विषयावर किमान एक तास व्याख्यान देऊन श्रोत्यांशी कमीत कमी २५ ते ३० मिनिटे चर्चा करावी अशी अपेक्षा आहे.
८. वक्त्याला मराठी भाषेची चांगली जाण असणे आवश्यक आहे.
९. वक्त्याचे वय २५ ते ६० च्या दरम्यान असावे. (समाजप्रबोधनाच्या कार्यात सक्रिय सहभाग व विशेष योगदान असणाऱ्या वक्त्यास ही अट लागू नाही)
१०. वक्ता मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा, (पदवी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी.) (समाजप्रबोधनाच्या कार्यात सक्रिय सहभाग व विशेष योगदान असणाऱ्या वक्त्यास ही अट लागू नाही)
११. वक्त्यांना व्याख्यानासाठी एक किंवा जास्तीत जास्त तीन व्याख्यान विषयाचीच निवड करता येईल.
१२. वक्ता विद्यापीठ कार्यक्षेत्रातील रहिवासी असणे आवश्यक आहे. (नांदेड,लातूर,परभणी,हिंगोली) तथापी विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील वक्त्यांचे नामनिर्देशन करण्याचा अधिकार समितीने राखून ठेवला आहे.

१३. वक्ता निवड बहि:शाल शिक्षण मंडळाच्या ‘वक्ता निवड समिती’ मार्फतच केली जाईल. या संदर्भात निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१४. वक्ता ज्या विषयावर व्याख्यान देणार आहे त्या विषयावर वक्त्याला प्रत्यक्ष व्याख्यान देण्यासाठी/चर्चा करण्यासाठी बोलविण्यात येईल.

१५. वक्त्यास बहि:शाल शिक्षण केंद्राकडून व्याख्यानासाठी तीन वेळा निमंत्रणे पाठवून देखील वक्त्याने केंद्राला काहीही न कळविल्यास त्यांचे नाव वक्ता सूचीतून कमी करण्यात येईल.

१६. ग्रामीण भागात आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी होऊन मार्गदर्शन करावे लागेल.

१७. संयोजकांनी नियोजित कार्यक्रमाची लेखी माहिती विद्यार्थी कल्याण विभागाला कार्यक्रमाच्या पुर्वी किमान पाच दिवस अगोदर देणे बंधनकारक आहे.

१८. वक्त्यास आपला विषय वक्ता निवड समितीसमोर सादर करावा लागेल. त्यानंतर वक्ता निवडीचा अंतिम अधिकार समितीकडे असेल.

१९. वक्त्याची मांडणी राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारी नसावी.

२०. वक्त्यांचा व विषयांचा आढावा दर तीन वर्षांनी घेतला जाईल व त्यामध्ये कालानुरुप बदल केले जातील.

२१. नियुक्त समितीने वक्त्यांची निवडलेली यादी शैक्षणिक वर्ष २०१६–१७ पासून लागू राहील.

२२. अर्जदाराला वक्ता निवड प्रक्रियेस स्वखर्चाने उपस्थित राहवे लागेल.

स्वाक्षरीत/—
डॉ. राजेश्वर दुडूकनाळे
संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग.